VOL- XII ISSUE- VIII AUGUST 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# उस्मानाबाद जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील समस्यांचा तेथील लोकजीवनावर होणारा परिणाम : एक अभ्यास

**कैलास सर्जेराव मोटे**
रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन,
रेणापूर

**प्रा.डॉ. जगदीश देशमुख**
राज्यशास्त्र विभाग,
वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी

**प्रस्तावना :**

भारत हा खेड्यांचा देश आहे म्हणूनच महात्मा गांधीजींनी ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य दिले होते, त्यांनी असे म्हटले होते की, देशातील खेड्याचा विकास झाला तरच देशाचा विकास संभव आहे. मात्र याकडे कोणत्याच शासन यंत्रणेने वा सरकारने विशेष असे लक्ष दिले नाही; हे आजच्या ग्रामीण भागाच्या परिस्थितीवरून स्पष्ट होते. ग्रामीण समस्येची जाणीव करून देण्यासाठी ग्रामीण भागाकडे व विशेषतः शेतीच्या विपणन व्यस्थेकडे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस दादाभाई नवरोजी, रमेशचंद्र दत्त इत्यादी अभ्यासू नेत्यांनी देशाचे व राज्यकर्त्यांचे लक्ष वेधले. त्या काळात दुष्काळ आयोगही नेमले पण शेती व एकदंर ग्रामीण प्रश्नांचा अभ्यास करण्याचे पध्दतशीर प्रयत्न १९२४ साली नेमलेल्या रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चर या आयोगाने केले. त्याचा अहवाल १९२९ साली तयार झाला. राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व करीत असतांना म. गांधींनी खेडयाची दुर्दशा ओळखून तरूणांना खेड्याकडे चला असा संदेश दिला. ग्रामीण विकासासाठी ग्रामोदयोगांचे पुनरूज्जीवन हा मार्ग त्यांनी सूचविला व चरखा हे केवळ त्याचे नव्हे तर समग्र राष्ट्रीय चळवळीचे प्रतीक बनविले. त्यांच्या प्रयत्नामुळे ग्रामीण प्रश्नांचा अधिक सखोल अभ्यास सुरू झाला. यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानाचा पूर्ण बोध होत गेला. १९३५ साली भारतीय राष्ट्रीय समितीने शेती, ग्रामीण उद्योग, खेडयातील शिक्षण, आरोग्य वाहतूक व दळणवळाच्या सोयी अशा विविध प्रश्नांचा अभ्यास केला. भारतीय कृषी, 'अर्थशास्त्र संस्था' ही संस्था मुंबईला स्थापन केली. या संस्थाने विविध ग्रामीण प्रश्नांचा अभ्यास सुरू केला. प्रत्यक्ष कृषी क्षेत्रामध्ये म. गांधींच्या सेवाग्राम आश्रमाच्या व बंगालमध्ये कविवर्य रविंद्रनाथ टागोरांनी 1901 मध्ये शांतिनिकेतन व 1922 मध्ये श्रीनिकेतन ही संस्था स्थापन करून या संस्थांचा मदतीने ग्रामीण विकास आणि सामाजिक सुधारनेला हातभार लावण्याचे काम केले.

इंग्रजी राजवटीमध्ये तसेच त्यापूर्वी बडोदे संस्थानाने ग्रामीण विकासाचे स्वतंत्र खाते सुरू केले होते. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाचे निर्णय घेतले जात होते. ब्रिटिश हिंदुस्थानातील प्रांतिक सरकारांनी शेती, शिक्षण आरोग्य, सहकार इत्यादी संदर्भातील ग्रामीण विकासाचे काही कार्यक्रम हाती घेतले होते. यामुळे शेतीसाठी पाणी, तसेच पिकांचा आढावा घेण्यास मदत मिळत असे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील सरकारी धोरण :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आर्थिक विकासाच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देण्यात येऊ लागले. अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे ही निकडीची समस्या होती. त्या बाबत नेमलेल्या 'अधिक धान्य पिकवा चौकशी समिती' ने १९५१ साली सादर केलेल्या अहवालात शेती सुधारणे बरोबरच ग्रामीण विकासाच्या समग्र समस्येबाबत काही विचार मांडले. ग्रामीण भागातील लोकांचा भौतिक, सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शिक्षण, कृषी, राजकीय, सामाजिक, नैतिक, रोजगार आणि प्रशासकीय स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणून ग्रामीण भागाला विकसित किंवा प्रगत भागाबरोबर नेणे महत्त्वाचे आहे. तेव्हाच देशाचा सर्वांगीण विकास होईल. आज देशाला स्वातंत्र्य मिळूण ७८ वर्ष पूर्ण झाले परंतु देशातील लोकांच्या जीवनमानात जो बदल अपेक्षित आहे; तो बदल दिसून येत नाही. आज देशातील लोक विकासापासून कोसो दूर आहेत. देशातील लोकांच्या गरजा व त्यांची क्रयशक्ती विचारात घेऊन आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे

होते. परंतु आजही आपण लोकांच्या गरजा पूर्ण करू शकलो नाहीत ही शोकांतिका आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या जो पर्यन्त शासन व प्रशासन समजून घेत नाही तोपर्यंत त्या समस्या सोडवणे अवघड आहे.

खेड्यातून शहराकडे अफाट वेगाने जात असलेला आपला उस्मानाबाद-धाराशिव जिल्हा स्वच्छ, समृद्ध आणि आनंदी निर्माण करण्यासाठी जबाबदार असलेल्या प्रत्येक घटकाने जबाबदारीने काम करायला हवे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकासासाठी समाजातील प्रत्येक घटकाला समान न्याय दिला पाहिजे. यासाठी कार्यक्षम व्यक्ती आणि संस्था यांनी समाजासाठी करण्यात येणाऱ्या कामाचे योग्य व प्रामाणिक मूल्यमापन करण्याची गरज आहे; तर उस्मानाबाद (धाराशिव) जिल्हा महाराष्ट्र आणि देशासाठी अनुकरणीय ठरेल. महाराष्ट्रात सर्वाधिक वेगाने शहरीकरण होत असलेल्या ठाणे जिल्ह्या नंतर पुण्याचा नंबर लागतो. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराच्या परिसरात कारखानदारी वाढत राहिल्याने वेगाने नागरिकरण होत आहे. मात्र दुसरीकडे मराठवाडयातील उस्मानाबाद (धाराशिव) जिल्हयामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार व सामाजिक विकासाचे प्रश्न अनुत्तरित आहेत. याचे कारण असे की, लोकांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने शेती कामासाठी मजूर मिळत नाहीत. ग्रामीण भागामध्ये उद्योगधंदा उभारण्यासाठी लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे जो पाठपुरावा करणे आवश्यक आहे तो होतांना दिसत नाही. विकासासाठी जोपर्यंत नागरिकांची मागणी होत नाही तो पर्यंत शासन गांभीर्याने याकडे लक्ष देणार नाही. यासाठी त्या त्या विभागातील लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात एक जिल्हा परिषद, 8 पंचायत समित्या आणि 622 ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामीण भागाच्या विकासासाठी कार्यरत आहेत. जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी काम करणाऱ्या अनेक यंत्रणा असूनही जिल्हा अनेक समस्यांचा सामना करत आहे.

**उस्मानाबाद जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील प्रमुख समस्या :**

देशाची लोकसंख्या आज 140 कोटी च्या जवळपास आहे. या वाढत्या लोकसंख्ये बरोबरच देशातील साधन संपत्तीचा विकास हा त्याच पटीत होणे अपेक्षीत होते. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात व लोकांच्या गरजांच्या प्रमाणात झालेला आहे असे म्हणता येणार नाही. देशात उद्योग, रोजगार, रस्ते, पाणी, वीज, आरोग्य व शिक्षण यामध्ये ज्या गतीने विकास होणे अपक्षेत होते त्या प्रमाणात झालेला नाही. उस्मानाबाद जिल्ह्याचा विचार करता जिल्हयाची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 16.57 लाख इतकी होती तर 2023 च्या संभाव्य आकडेवारी नुसार जिल्हयाची लोकसंख्या 18.42 लाख इतकी आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्ह्याच्या विकासात अधिक भर पडणे आवश्यक होते. मात्र जिल्ह्यातील बहुतांश समस्या या आजही पूर्वी प्रमाणे तशाच असल्याचे पाहायला मिळते. जिल्ह्यातील वाडी, तांडे, वस्ती व गांव आजही मूलभूत सुविधापासून वंचित आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या विकास कामावर अब्जावधी रूपये खर्च करून ही ग्रामीण भागातील मलभूत प्रश्न आजही सोडवता आले नाहीत. जिल्ह्यातील सर्वाधिक समस्या म्हणजे सिंचन, उद्योग व रोजगार या समस्यामुळे जिल्ह्याच्या एकूणच विकासावर खूप मोठा परिणाम झालेला आहे. जिल्ह्यामध्ये वारंवार पडणारा कोरडा व ओला दुष्काळ, पूर परिस्थिती निर्माण होत असल्याने लोकांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. शहराचे औद्योगीकरण मोठ्या प्रमाणावर होत असल्याने शहरामध्ये औद्योगिक व सेवाक्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. यामुळे खेडी ओस पडू लागली आहेत. ग्रामीण जीवनाची सर्वात मोठी समस्या ही रोजगाराची आहे. जीवन जगण्याचा प्रश्नच निर्माण होत असेल तर इतर गोष्टी या दूरच्या आहेत. खेडयातील लोकांच्या उपासमारीचा प्रश्न आज ऐरणीवर आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी खेड्यातील स्वच्छ वातावरण सोडून शरातील झोपड पट्टीतील प्रदूषीत वातावणामध्ये लोकांना जीवन जगण्यासाठीचा संघर्ष करावा लागत आहे. ज्या खेड्यात कच्चा माल पिकवला जातो त्याच खेड्यात प्रक्रिया उद्योग उभारले जात नाहीत. पिकवणारा पेक्षा विकणारा श्रीमंत आहे. शेतकरी कर्ज बाजारी झाला तर व्यापारी सावकार म्हणून वागू लागला आहे. याचा विचार करून ग्रामीण भागाच्या समृद्धीसाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील शेतकरी शेतीला जोड व्यवसाय म्हणून पशुपालन करतात, जिल्ह्यातील शेती ही पावसावर अवलंबून आहे. येथे सिंचनाच्या पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शेती व शेतक-यांचा विकास झालेला नाही. याच कारणामुळे उद्योग धंद्याची उभारणी होऊ शकली नाही. मागील तीन वर्षा पासून कुपनलीका, विहिरी व शेततळे याच्या माध्यमातून पाण्याचे साठवण करून शेतीला पाणी देऊन शेतकरी उत्पन्न घेऊ लागला आहे. मराठवाडयातील

उस्मानाबाद जिल्हयामध्ये सिंचनाचा ज्या प्रमाणात विकास होणे अपेक्षीत होते त्या प्रमाणात विकास झालेला नाही. यामुळे येथील लोक रोजगारासाठी गाव सोडून शहराकडे स्थलांतर करू लागले आहेत.त्याची कारणे लक्षात घेणे गरजेचे आहे.

**जिल्ह्याच्या ग्रामीण विकासाच्या समस्येचे स्वरूप :**

1. आर्थिक विकाससंदर्भातील समस्या
2. उद्योग व व्यवसाय विकास विषयक समस्या
3. शिक्षण, आरोग्य इत्यादी सामाजिक गरजा व सुविधा विषयक समस्या
4. सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक दृष्टिकोन
5. रोजगार, मूलभूत व पायाभूत सुविधा विषयक समस्या
6. सिंचन व पाणी प्रश्न

जिल्ह्याच्या ग्रामीण भागाच्या वरील समस्या बरोबरच इतरही समस्या ग्रामीण भागाच्या विकासाला अडथळे निर्माण करतात.

**गरिबी:** ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात गरिबी आहे, ज्यामुळे लोकांना त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणेही कठीण होते.

**निरक्षरता** : शिक्षण आणि साक्षरतेच्या अभावामुळे लोकांना चांगले जीवन जगण्यासाठी संधी मिळत नाहीत.

**रोजगाराचा अभाव व त्यातून निर्माण होणारी बेरोजगारी** : ग्रामीण भागात रोजगाराच्या संधींची कमतरता आहे, ज्यामुळे बेरोजगारी वाढते. शेती व शेती पूरक पशूपालन व कुक्कुटपालन हेच रोजगाराची साधने आहेत रोजगाराच्या इतर संधी उपलब्ध नसल्याने बेरोजगारी वाढत आहे.

**निकृष्ट दर्जाची कामे व भ्रष्टाचार :** ग्रामीण भागात होणारी विकास कामे ही निकृष्ट दर्जाची असल्याने कामामध्ये गुणवत्ता राहत नाही. नियमानुसार वस्तूंचा वापर होत नाही. जास्तीचे बिले दाखवून शासनाकडून पैसे उचलले जातात. अशा प्रकारे भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर होतो.

**पायाभूत सुविधांचा अभाव** : चांगले रस्ते, वीज, पाणी, आरोग्य सेवा आणि शिक्षण सुविधांची कमतरता आहे. आज ग्रामीण भागामध्ये पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे.

**स्थानिक राजकारण :** गावांतर्गत चालणाऱ्या स्थानिक राजकारणाचा गावाच्या विकासावर परिणाम होतो इतकेच नाही तर जिल्ह्याच्या राजकारणाचा ही ग्रामीण भागाच्या विकासावर सकारात्मक व नकारात्मक परिणाम होतो. जिल्ह्याच्या ग्रामीण विकासावर राजकारणाचा नकारात्मक परिणाम झाला आहे.

**कृषी विषयक समस्या** : अनियमित पाऊस, खतांचा आणि बियाणांचा अभाव, तसेच शेतीमालाला योग्य भाव न मिळणे यांसारख्या समस्यांमुळे शेतकरी अडचणीत आहेत. अशा अनेक समस्या आहेत यामुळे जिल्ह्याच्या विकासावर मोठा परिणाम होतो.

**जिल्ह्याच्या ग्रामीण विकासासाठी उपाय :**

**उद्योगधंदे व आर्थिक विकास :** विविध व्यवसायांचा अभाव व बहुतांश नागरिकांचे कमी उत्पन्न ही ग्रामीण अर्थव्यवस्थेची मुख्य लक्षणे होत. शेती हा तेथील मुख्य व्यवसाय. ग्रामीण भागातील सुमारे 65 टक्के पेक्षा अधिक लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेतीवरील लोकसंख्येचा भार वाढला असून त्याचा उत्पादनक्षमतेवरही विपरीत परिणाम होत आहे. शेत जमिनीचे वाटप अतिशय विषम प्रमाणात झालेले आहे. त्यामुळे भूमिहीन शेतमजूर व छोटे शेतकरी यांचे प्रमाण विशेष असून त्यांचे उत्पन्न अतिशय कमी आहे. शेतीचे तंत्र परंपरागत पध्दतीचे असून उत्पादनक्षमता कमी आहे. बिगरशेती व्यवसायांपैकी सुतार, लोहार, चांभार, हा शेतीधंदयाला पूरक असून कुंभार, तेली, कोष्टी न्हावी, धोबी हे प्रापंचिक सेवा पुरविणारे आहेत. शहरात वाढत असलेल्या आधुनिक कारखाणदारीच्या स्पर्धेमुळे हे व्यवसाय शहरात वाढत असलेल्या आधुनिक कारखानदारीच्या स्पर्धेमुळे मोडकळीस आले आहे. यामुळे साहजिकच त्यांचे उत्पन्न मागणी अभावी फार कमी झाले आहे. त्यांच्यापैकी काहीजणांचे व्यवसाय आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुस्थिर करणे शक्य आहे. इतरांना मात्र नवेच व्यवसाय दयावे लागणार आहेत. शेती-विकासासाठी जमीनसुधारणा व जलसिंचन हे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर व जलद गतीने अंमलात आणण्याची गरज आहे. शेती किफायतशीर होऊ लागली की आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याकडे शेतकरी आकर्षित होऊ लागले आहेत. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी अन्य व्यवसाय व उद्योगधंदे वाढविण्याची

गरज निर्माण झाली आहे. असे झाले तर येथील तरुणांना रोजगार मिळेल. शेती आणि इतर व्यवसाय यांच्या विकासाला गती मिळण्यासाठी अर्थकारणाचे जाळे निर्माण करण्याची गरज आहे. वाहतूक आणि दळणवळणाची साधने, वीजपुरवठा, बाजाराची सोय, तांत्रिक सेवा यांचा विकास करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**पर्यटन स्थळांच्या विकासातून रोजगार निर्मिती :** जिल्ह्यात जवळपास प्रत्येक तालुक्यात ऐतिहासिक, धार्मिक वास्तु तसेच नैसर्गिक पर्यटन स्थळ आहे. या पर्यटन स्थळांचा विकास झाला तर पर्यटकांची संख्या वाढून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होईल.

**सामाजिक गरजा व सुविधा** : सार्वजनिक स्वच्छता व आरोग्याच्या सोयी आज ही ग्रामीण भागात फारच कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची बारमाही सोय बहुतांश खेडयात नाही; संडास व गटारांचा प्रश्न आजही सुटलेला नाही. नाल्याची कामे होतात परंतु ती निकृष्ट दर्जाची झाल्याने सांडपाणी रस्त्यावर येते तसेच नाल्याची साफ सफाई नियमित केली जात नाही यामुळे रोगराई पसरली जाते. गावातील रस्ते अतिशय अरूंद असतात. दिवाबत्तीची सोय नसते. औषधोपचाराची सोय पंधरा ते वीस खेडयांच्या मध्यभागी असलेल्या मोठ्या खेडयात असते. हे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामपंचायतीने योग्य नियोजन करावे प्रत्येक सदस्याकडे कामाची जबाबदारी द्यावी. प्रत्येक गावात सर्व सोईसुविधांनी युक्त प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करावे. लोकांच्या आरोग्यासाठी गाव नियमित स्वच्छ राहील यासाठी प्रयत्न करावेत. स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून कामे करावीत.

शिक्षणाबाबतही अशीच दुरावस्था आहे. प्राथमिक शिक्षणाची सोय बहुतांश गावात आहे. माध्यमिक, उच्च आणि तांत्रिक शिक्षणाची सोय स्वाभाविकपणेच शहरांपुरती मर्यादित आहे. शिक्षण व आरोग्य या सोयी चांगल्या आणि सुखी जीवनासाठी आवश्यक आहेत. खेडे गावातील मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळेल यासाठी प्रयत्न करावेत. शाळेत पुरेशा दर्जेदार भौतिक सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

**सामाजिक संबंध व दृष्टिकोण** : ग्रामीण समाज रचना जुन्या रूढी व परंपरा यांनी आधिक जखडलेली आहे. जातिव्यवस्था ही ग्रामीण जीवनात अधिक प्रभावशाली आहे. जातिभेद व विशेषतः अस्पृश्यता हे लोकशाही जीवनदृष्टीला तर हानिकारक आहेच शिवाय आर्थिक व्यवहारांतही त्यामुळे अडथळे निर्माण होतात. ही समस्या फक्त जिल्हया पुरती मर्यादित नाही तर सर्वत्र आहे. कनिष्ठ समजल्या जाणा-या जातीतील व्यक्तींनी उच्च वा प्रगत समजले जाणारे व्यवसाय करू नयेत असे राहिले नाही समाज बदलत आहे; तरी ही जाती आधारित व्यवस्था ग्रामीण भागात काही प्रमाणात दिसून येते. जाती व्यवस्था बदलणे व विशेषतः जातिभेद मानण्याची मानसिक सवय घालविणे कनिष्ठ, दलित जातींना विकासाची आर्थिक संधी उपलब्ध करून देणे हाही ग्रामीण विकासाच्या समस्येचा महत्त्वाचा भाग आहे. याबाबत शासन, प्रशासनयंत्रणा, कायदे या पेक्षा सामूहिक कार्यक्रम व स्वयंस्फूर्त चळवळी अधिक प्रभावशाली ठरतात. प्रत्येक जातीतील लोकांनी आपले विचार व आचार बदलण्याची गरज आहे. जाती आधारित शासकीय ध्येय धोरणे बंद करावीत. प्रशासनयंत्रणा व योजना परिवर्तनाला अधिकाधिक अनुकूल असाव्यात अशी खबरदारी घेणे गरजेचे आहे. तरच ग्रामीण विकासाला गती मिळेल.

**समुहविकास योजना** : ग्रामीण विकासाचे हे विविध प्रश्न हाताळण्यासाठी सरकारच्या वेगवेगळया खात्यांमार्फत आखलेल्या योजनांना पंचवार्षिक योजनांत स्थान देण्यात आले. पण विविध खात्यांच्या योजना व कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीत अधिक चांगले संयोजन व्हावे ग्रामीण भागावर त्यांचा आवश्यक त्या प्रमाणात परिणाम व्हावा आणि मुख्य म्हणजे या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत स्थानिक जनतेला सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दयावी. विकास कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी गटविकास अधिकारी व त्यांच्या नेतृत्त्वाखाली शेती, पशुपालन, सहकार, समाजशिक्षण यांच्यासाठी एकेक विस्तार अधिकारी, आवश्यक इतका सेवकवर्ग प्रत्येक खेडयासाठी पुरविणे व रस्ते, आरोग्य, स्वच्छता, शाळांच्या इमारती, तालमी, पिकांच्या पाण्याची योजना, समाजमंदिरे इत्यादी स्थानिक विकासाचे प्रकल्प हाती घ्यावयाचे, त्याच्या खर्चा पैकी काही भाग स्थानिक जनतेने श्रमदानाच्या रूपाने दयावा. शेती सुधारणेसाठी राष्ट्रीय विस्तार सेवा योजना अंमलात आणावी

व कामाच्या यशस्वी अंमलबाजवणीचे योग्य व अचूक मूल्यमापन करावे. असे केल्याने ग्रामीण भागाच्या विकासाला गती मिळण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथसूची :**


1. देसाई ए. आर.,(1994), भारतातील ग्रामीण समाज, लोकप्रिय प्रकाशन, मुंबई
2. जाधव वा. प्र.,(2021), जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2020 जिल्हा उस्मानाबाद, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, उस्मानाबाद.
3. मोहटे सुनील,(जानेवारी 2025, शाश्वत ग्रामीण विकासातील समस्या आणि उपाययोजना, Young Researcher, A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal.
4. शेटे आर. बी.,(2021), भारतातील ग्रामीण विकासातील समस्या, Knowledge Resonance Research Journal.
5. https://icecd.org/blog/challenges-in-rural-development-in-india - भारतातील ग्रामीण विकासातील आव्हाने प्रमुख मुद्दे आणि पुढील वाटचाल.
6. https://vishwakosh.marathi.gov.in-ग्रामीण विकास